# कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
## टोल फ्री क्रमांक - 1064
## कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 28.06.2021.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान, पंचायत समिती मंठा अंतर्गतचा तालुका अभियान व्यवस्थापक श्री. तुकाराम छबुरा कु-हाडे यास 3,500/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आलोसेचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | ईतर लोकसेवक श्री. तुकाराम छबुराव कु-हाडे वय 36 वर्ष व्यवसाय नोकरी तालुका अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान, अंतर्गत पंचायत समिती मंठा जि. जालना रा. योगेशनगर अंबड रोड, जालना |
| 2 | गुन्हा घडला ता व ठिकाण | :- | दिनांक 28.06.2021 रोजी पंचायत समिती कार्यालय मंठा, जि. जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 3,500/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान, अंतर्गत पंचायत समिती मंठा येथे तालुका व्यवस्थापक म्हणुन कार्यरत आहेत, त्यांचे दोन वर्षापासुन प्रति माह 1,500/- रुपये याप्रमाणे मागील दोन वर्षापासुन एफ टी ए रक्कम प्रलंबित आहे, तसेच त्यांचे मागील तीन महिन्यांचा प्रवासभत्ता बिल थकीत आहे. त्यांनी तालुका अभियान व्यवस्थापक श्री. तुकाराम छबुराव कु-हाडे यांना त्यांचे एफ टी ए तसेच प्रवासभत्ता देयक मंजुर करुन देण्याची विनंती केली असता, तालुका अभियान व्यवस्थापक श्री. तुकाराम छबुराव कु-हाडे यांनी त्यांचे एफ टी ए तसेच प्रवासभत्ता देयक मंजुर करुन देण्यासाठी 3,500/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 25.06.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान, अंतर्गत पंचायत समिती मंठा येथील तालुका अभियान व्यवस्थापक श्री. तुकाराम छबुराव कु-हाडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मागील दोन वर्षापासुन एफ टी ए रक्कम मंजुर करुन देण्यासाठी, तसेच त्यांचे मागील तीन महिन्यांचा प्रवासभत्ता बिल थकीत रक्कम मंजुर करुन देण्यासाठी 3,500/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाल्याने, त्यानुसार आज दिनांक 28.06.2021 रोजी पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना येथे सापळा लावला असता तालुका अभियान व्यवस्थापक श्री. तुकाराम छबुराव कु-हाडे यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे मागील दोन वर्षापासुन एफ टी ए रक्कम मंजुर करुन देण्यासाठी, तसेच त्यांचे मागील तीन महिन्यांचा प्रवासभत्ता बिल थकीत रक्कम मंजुर करुन देण्यासाठी 3,500/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारली असतांना, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना येथे रंगेहाथ पकडले आहे.

लोकसेवक श्री. तुकाराम छबुराव कु-हाडे वय 36 वर्ष व्यवसाय नोकरी तालुका अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियान, अंतर्गत पंचायत समिती मंठा जि. जालना रा. योगेशनगर अंबड रोड, जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास **02482-220252**, तसेच टोल फ्री क्रमांक **1064** वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. **8975762906**, पोलीस.निरीक्षक मो.नं. **8390757835, 9823216788** वर संपर्क करावा.

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना